नियमित फौजदारी खटला नं. ३९७/२०२४

निशाणी– ३७

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः– लता अशोक गुंजाळ,

वयः– ५९ वर्षे, धंदाः– व्यवसाय

राहणारः– ढवणवस्ती, तपोवरोड, अहिल्यानगर

## सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः–

१. दि. २३/०४/२०२३ रोजी मी घरी असताना दु.१२–३० ते १२–४५ च्या सु. माझा मुलगा रिक्षा घेउन घरी जेवण करण्यासाठी येत होता. मला आरडा ओरडयाचा आवाज आला. त्यामुळे मी घराबाहेर जाउन पाहिले असता मला माझा मुलगा दिपक दिसला. त्याला शब्बो व तिचा मुलगा अरमान हे माझा मुलगा दिपक यास हाताने मारत होते. त्यानंतर सोनु आला. सोनुने माझ्या मुलाला डोक्यावर लाकडी दांडक्याने मारले. मी आरडा ओरडा केल्यावर सोडवा सोडव केली. त्यानंतर शबनम आली व तिने माझ्या मुलाला झापड मारली. त्यानंतर शबनम व अरमान माझ्या मुलाचे हात धरले व अल्हाबक्शी याने त्याच्या कानावर मारले. त्यामुळे माझ्या मुलाला पाच ते दहा मिनीटे काही ऐकायला येत नव्हते. मी त्याला खाली बसवले व पाणी पाजले. त्यानंतर माझ्या पतीला फोन करुन घटनास्थळावर बोलवले व ते आल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो व माझ्या मुलाने फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपींना ओळखते. त्यापैकी जावेद शेख आज न्यायालयात हजर आहे. उर्वरीत आरोपी न्यायालयात हजर नाहीत.

## उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. वाय. बी. नेमाने यांचेमार्फत सुरुः–

२. मला लिहिता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ढवणवस्तीमध्ये दाट घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथे एकच गाडी जाईल असे छोटे रस्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दाट घरे असल्यामुळे काही झाले तर लोक घराबाहेर येउन बघतात. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावरील दुकानामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरडा ओरडा झाल्याच्या आगोदर काय झाले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मारहाण झाल्यानंतर तेथे काय झाले हे मी माझ्या मुलाला विचारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने मारहाण सुरु असताना मदत मागितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वस्तीतील कोणीही त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचे शेजारी पाजारी यांनी मध्ये पडुन

भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला माझ्या घरी जाण्यासाठी आरोपीच्या घरासमोरील रोडवरुन जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा जोराने गाडी घेउन जात होता. माझा मुलगा रोडने जोरात गाडी घेउन जात असल्यामुळे घटनेच्या आगोदर आरोपींनी त्याच्या विरुध्द अदखलपात्र फिर्याद दिली होती. माझे घटनेच्या आगोदर आरोपींसोबत वाद झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे गल्लीतील सर्व लोकांसोबत तसेच वाद आहेत व त्यामुळे त्यांनी माझ्या विरुध्द पोलीस अधिक्षक साहेबांना तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा व पती यांनी मला पोलीस स्टेशनमध्ये काय तक्रार दिली हे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांकडे जबाब देण्यासाठी गेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस सुध्दा माझ्याकडे कधी जबाब घेण्यासाठी आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही व केवळ आरोपीसोबतचे वाद असल्यामुळे मुलाच्या सांगण्यावरुन सदर जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

दि. १८/०५/२०२६. ( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.